२९८

(२५)

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

गुरुवार दिनांक २९ सप्टेंबर १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या २४ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

---

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची २४ वी बैठक दिनांक २९ सप्टेंबर १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. मनोहर विठोबा कोकाटे, | सभापती |
| २] श्री. अशोक लाल, | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३] श्री. यादवराव कांबळे, | उपसचिव, गृ. नि. व वि. स. वि. मंत्रालय. |
| ४] श्री. सुनील कर्वे, | सदस्य. |
| ५] श्री. राजा चव्हाण, | -"- |
| ६] श्री. बाळकृष्ण धुमाळे, | -"- |
| ७] श्री. हेमंत मंडलिक, | -"- |
| ८] श्री. रविंद्र कोटकर, | -"- |
| ९] श्री. मोहन देसाई, | -"- |
| १०] डॉ. माला पाटील, | -"- |
| ११] श्री. चेतन शाह, | -"- |
| १२] श्री. कृष्णा गेनू कांबळे, | -"- |
| १३] श्री. अब्दुल रौफ पटेल. | -"- |
| १४] श्रीमती सरोज कपाडिया. | -"- |
| १५] प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी. | -"- |

सभेस सुरवात करण्यापूर्वी मान. सदस्या श्रीमती सरोज कपाडिया व मान. सदस्य श्री. रविंद्र कोटकर यांनी सभागृहास नुकत्याच झवेरी बाजार, केव्हल लेन आणि कामाठीपुरा येथे इमारती कोसळून तसेच २० अंबालाल दोशी मार्ग वरील इमारत आगीत भस्मसात होऊन मृत पावलेल्या व्यक्तींना सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात यावी

....२/...

असा प्रस्ताव मांडला. तद्नुसार सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली व पुढील ठराव सर्वानुमते संमत करण्यांत आला.

शोक ठराव क्रमांक :- २४/१५३

मुंबई शहरा मधील xxxxxx झवेरी बाजार, केव्हल लेन आणि कामाठीपुरा येथे इमारत कोसळून तसेच २० अंबालाल दोशी मार्ग वरील इमारत आगीत भस्मसात होउन मृत पावलेल्या व्यक्तींबद्दल तीव्र दु:ख व्यक्त करून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी असा ठराव सर्वानुमते संमत करण्यांत आला.

---

तद्नंतर उप सभापती व मुख्य अधिकारी श्री. अशोक लाल ह्यांनी मा. सभापती ह्यांच्या वतीने मा. सदस्य व उपस्थित अधिकारी ह्यांचे स्वागत करून सभेस प्रारंभ केला.

बाब क्रमांक :- २४.१

विषय :- दि. १९.८.९४ रोजी झालेल्या २३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

दिनांक १९.८.९४ रोजी झालेल्या २३ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करण्याबाबतचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १ ते ३१ वर सादर केलेला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा होउन तो सर्वानुमते स्थायी करण्यांत आला.

---

बाब क्रमांक :- २४.२

विषय :- अनुपालन अहवाल.

मागील बैठकीत दिलेल्या आश्वासनानुसार अनुपालन अहवाल पृष्ट क्र. ३३ ते ३९ वर सादर केलेला आहे. सदर अनुपालन अहवालावर चर्चा होउन त्याची नोंद घेण्यांत आली.

---

...3/..

बाब क्रमांक :- २४.३

विषय :- पुनर्बांधणी विभागाचे प्रस्ताव.

अ] प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

पुनर्बांधणी विभागाच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव पृष्ठ क्र.४१ ते १३५ फ वर सादर करण्यांत आलेले आहेत. सदर प्रस्तावांबाबतची माहिती उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सभागृहात दिली. सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मान.उपसचिव श्री.यादवराव कांबळे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, पुनर्बांधणीच्या प्रकल्पाला तीन टप्प्यामध्ये मंजूरी दिली जाते. १] मुळ प्रशासकीय मंजूरी २] तांत्रिक मंजूरी व ३] आवश्यक असल्यास सुधारीत प्रशासकीय मंजूरी. इयाबाबत अशा किती योजना सध्या मंडळातर्फे प्रगतीपथावर आहेत, त्यांना पूर्वी प्रशासकीय मंजूरी दिली होती का? व त्यांना आता सुधारित प्रशासकीय मंजूरी देणे आवश्यक आहे का? असल्यास त्याची कारणे काय आहेत. याबाबतचा सविस्तर अहवाल सभागृहापुढे सादर करण्यांत यावा. यावर मान.सभापती यांनी असे आश्वासन दिले की, सदरचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यांत येईल.

पूर्तता उ.मु.अ. [पुनर्र.]

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मान.सदस्य श्री.सुनिल कर्वे यांनी असे मत व्यक्त केले की, सुरुवातीस पुनर्बांधणीच्या प्रस्तावांना मान्यता दिल्यावर सदर प्रकल्प राबविण्यास चार ते पाच वर्षे लागतात. त्यामुळे सदर प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मंजूरी घेण्याची जरुरी भासते. कारण दरम्यानच्या काळात बांधकाम साहित्यात व मजूरीच्या दरात वाढ होते. त्यांनी यावर असे सुचविले की, एखादा नवीन पुनर्बांधणीच्या प्रकल्पास मंजूरी देताना पुढील संभाव्य वाढीचा विचार करुन मंजूरी देण्यांत यावी. जेणे करुन परत परत सुधारीत प्रशासकीय मंजूरी घेण्याची गरज भासणार नाही व प्रकल्प सुरळीत पार पडेल. चर्चेच्या ओघाओघात मान.सदस्य श्री.मोहन देसाई

...४/...

(७)



यांनी सभागृहास असे अवगत करुन दिले की, काही प्रकल्पांना कोर्टाच्या स्थगितीमुळे बराच विलंब लागतो. सदर प्रकरणे मुख्यत्वे करुन अशा मालमत्तेवर असणा-या झोपडयांच्या बाबतीत असतात. सदर प्रकरणात कोर्टाकडून स्थगिती उठविण्यात बराच कालावधी लागतो व साधारणतः सदर झोपडपट्टी-वासियांना त्यात सामावून घ्यावे असाच निर्णय जास्तीत जास्त प्रमाणात दिला जातो. तरी याबाबत त्यांनी सभागृहात असे सुचित केले की, अशा प्रकारची जी प्रकरणे आहेत त्यांचा मुख्य अधिकारी किंवा शासन स्तरावर निपटारा केल्यास सदर योजनेस लागणारा विलंब टाळता येईल. त्यामुळे वेळेचा व पैशाचासुध्दा अपव्यय टाळता येईल व योग्य वेळेत प्रकल्प पूर्ण होईल व त्यामुळे मंडळाची प्रतिमा उंचावेल. सदर सन्मा. सदस्य श्री. देसाई यांच्या मतास मान. सभापती यांनीही दुजोरा दिला. पुढे चर्चा करताना उपसचिव श्री. यादवराव कांबळे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, कामगार विभागातील उपकरप्राप्त इमारतींमध्ये असे आढळून आले आहे की, एकेका खोलीमध्ये भाडेकरु व पोट भाडेकरु एकत्र रहातात. परंतू जेव्हा सदर इमारत धोकादायक आहे असे घोषित केले जाते तेव्हा त्यांना व्हेकेशन नोटीस देते वेळी जे भाडेकरु असतात त्यांच्या नावाने न देता पोट भाडेकरुंच्या नावाने दिल्या जातात. अशा बाबतच्या प्रकरणांचे तक्रार अर्ज मुळ भाडेकरुंकडून शासनास प्राप्त झालेअसून त्याबाबत मुळ भाडेकरु सारखे तगादे लावत असतात. यावर उपमुख्य अभियंता [दक्षिण व उत्तर] यांनी असा खुलासा केला की, व्हेकेशन नोटीस देताना ती मुळ भाडेकरु [ ज्याच्या नावावर भाडे पावती आहे तो] व सध्या रहात असलेला रहिवाशी अशा संयुक्त नावाने दिली जाते.

चर्चेच्या ओघाओघात मान. सदस्य श्री. सुनिल कर्वे यांनी सभागृहास असे अवगत करुन दिले की, त्यांच्या माहितीतील उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु व घर मालक यांनी स्वतःच्या

सदर इमारत वास्तुशास्त्रज्ञाच्या देखरेखी खाली दुरुस्त केली. सदर वास्तुशास्त्रज्ञावर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केले आहे. हे योग्य आहे का? कारण घर मालक व भाडेकरू पुढाकार घेउन स्वत:च्या पैशाने जर दुरुस्ती करत असतील तर ती त्यांनी का करू नये? असे विचारले. यावर मान. सभापती श्री. कोकाटे यांनी असे सांगितले की, मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीची कमतरता लक्षात घेता जर एखाधा इपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरू/ रहिवाशी त्यांची इमारत स्वखर्चाने दुरुस्त करण्यासाठी पुढे येत असतील तर त्यांना प्रथम प्राधान्य देण्यांत यावे. तसेच सभापती यांनी उपसचिव श्री. यादवराव कांबळे यांना विनंती केली की, पुनर्बांधणीचा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविण्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यास शासन स्तरावर प्रयत्न करावेत. यावर चर्चा करताना उपसचिव श्री. कांबळे यांनी असे सांगितले की, मागील अधिवेशनात मान. मंत्री महोदयांनी निधी वाढवून देण्याबाबत मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आहे. सध्या पुनर्बांधणीच्या कामाकरीता "नॉन प्लॅन" मधून शासन निधी उपलब्ध करून देते, त्या ऐवजी आता फक्त पुनर्बांधणीच्या कामासाठी नियोजन [प्लॅनिंग] खात्याकडून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर विचार चा आहेत.

चर्चेच्या ओघाओघात मान. सदस्य श्री. चेतन शहा यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, ज्याप्रमाणे घर मालक व भाडेकरू यांना पूर्वी वापरण्यात आलेल्या इमारतीतील चटई क्षेत्र निर्देशांक २.०० पेक्षा अधिक असल्यास त्या अधिकच्या चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत पुनर्विकासासाठी देण्यांत येते, परंतू मंडळास फक्त ३.१९२ चटई क्षेत्र निर्देशांकच उपलब्ध आहे, तरी याबाबत मंडळाला ३.१९२ पेक्षा पूर्वी वापरण्यांत आलेल्या चटई क्षेत्र निर्देशांक जास्त असल्यास त्या जास्तीच्या चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत देण्यांत यावी. यावर उपसचिव श्री. कांबळे यांनी तसा प्रस्ताव शासनास पाठविण्याची विनंती मुख्य अधिकारी यांना केली.

पूर्तता उ. मु. अ. [पुनर्र.]

तद्नंतर पुनर्बांधणीच्या प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतच्या प्रस्तावांवर औपचारिक चर्चा होऊन सर्वानुमते सर्व प्रस्तावांना मान्यता देण्यांत आली.

ठराव क्रमांक :- २४/ १५४

पुनर्बांधणी विभागाच्या खालील प्रस्तावांना सर्वानुमते सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यांत आली.

| प्रस्ताव | प्रशासकीय मान्यता. |
|---|---|
| १] इ. क्र. ३४६ "ब" रंगारी चाळ, सेनापती बापट मार्ग, ग/इ विभाग, मुंबई. | ४५.२९ लक्ष भूसंपादनासहीत. |
| २] इ. क्र. ११८ डी मानाजी राजूजी चाळ, सनमिल लेन, ग/द विभाग, मुंबई. | ५४.३१ लक्ष भूसंपादनासहीत. |
| ३] इ. क्र. २४४-२४४ अ पांडूरंग वकिल चाळ, सेनापती बापट मार्ग, ग/उ विभाग, मुंबई. | १७३.१६ लक्ष भूसंपादनासहीत. |
| ४] इ. क्र. ३४२-३४२ डी. जे. जे. रोड, भायखळा, "ई" विभाग, हिरजी गोविंदजी बिल्डिंग, मुंबई. | १४०.९० लक्ष भूसंपादनासहीत. |
| ५] इ. क्र. ६२ जेल रोड व १५-१७ उमरखाडी रोड, "ब" विभाग, मुंबई. | १०६.२० लक्ष |
| ६] इ. क्र. ३५-डी-४ व डी-६, मुगभाट क्रॉस लेन, गोरेगांव, "डी" विभाग, मुंबई. | ४०.४९ लक्ष |
| ७] इ. क्र. १-३-५-७-९-११-१५-१७, ११ वी गल्ली, कामाठीपुरा, "ई" वार्ड, मुंबई. | ७७.११ लक्ष |

ब] बावला कंपाउंड, "डी" बिल्डींग, चिंचपोकळी येथील पुनर्बांधणी कामाच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १३७ ते १४५ वर सादर केलेली आहे. सदर कामाच्या निविदांबाबत मुख्य अधिकारी यांनी सभागृहास कल्पना दिली. त्यावर चर्चा होउन मान. सदस्य श्री. सुनिल कर्वे यांनी असे सुचविले की, अशा प्रकारच्या निविदा मंजूर करण्यासाठी एक निविदा समिती स्थापन करण्यांत यावी व त्यात निविदा मंजूर करुन घ्याव्यात व तोपर्यंत सदर बाब प्रलंबित ठेवण्यांत यावी. यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

बाब क्रमांक :- २४.४.

विषय :- दक्षिण परिमंडळातील विभागाचे प्रस्ताव.

अ]

विषय :- दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतीमधील धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १४७ ते १४९ वर सादर केलेली आहे. यावर चर्चा होउन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव क्रमांक :- २४/ १५५

दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतीमधील धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या सन १९९४-९५ या आर्थिक वर्षी रु. १००.०० लक्ष तरतुदीपैकी दि. १.९.९४ ते ३१.३.९५ पर्यंत रु. ३७.२४ लक्ष खर्च करण्यास मंजूरी देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

....८/..

९५

: ८ :

ब] डी-२ विभागात मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामांच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १५१ ते १५३ वर सादर करण्यांत आलेली आहे. त्यावर चर्चा होऊन सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव क्रमांक :- २४/ १५६

डी-२ विभागात मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामांच्या सुधारीत अंदाजपत्रककस रु. २.९८ लक्ष एवढया रकमेस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते देण्यांत आली.

---

क] इ.क्र. २७५ बी जहांगीर दाजी स्ट्रीट हया इमारतीच्या प्रशासकीय मंजूर अंदाजपत्रकातील रस्त्याच्या नावाची चुकीची दुरुस्ती करण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १५५ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर बाब टिप्पणीवर चर्चा होऊन इ.क्र.२७५ बी जावजी दादाजी स्ट्रीट ऐवजी इ.क्र.२७५ बी जहांगीर दाजी स्ट्रीट हीहया दुरुस्तीची सर्वांनी नोंद घेतली.

ड] इ.क्र. ६५१ जे. एस. एस. रोड करंजिया बिल्डींग, मुंबई - २ ह्या इमारतीस ८८[३] "अ" अन्वये मंजूरी देणे.

सदर विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १५७ ते १६३ वर ठेवण्यांत आली होती. सदर प्रस्तावाबाबतची थोडक्यात माहिती उपमुख्य अभियंता [द.] यांनी सभागृहास दिली. सदर विषयावर औपचारिक चर्चा करण्यात आली व चर्चेअंती सर्वानुमते उपरोक्त इमारतीच्या ८८[३] "अ" च्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव क्रमांक २४/ १५७

इ. क्र. ६५१, जे. एस. एस. रोड, करंजिया बिल्डींग, मुंबई - २ ह्या इमारतीच्या ८८[३] "अ" च्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

इ] उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याबाबतचे प्रस्ताव.

दक्षिण परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाज पत्रकाचे प्रस्ताव पृष्ठ क्र. १६५ ते ३१५ वर सादर केलेले आहेत. सदर प्रस्तावावर औपचारिक चर्चा होऊन सर्वानुमते सर्व प्रस्तावांना मंजूरी प्रदान करण्यांत आली.

ठराव क्रमांक २४/ १५८

दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांच्या परिशिष्ट "अ" वर सादर केलेल्या सर्व प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

...१०/...

४२५

१८



बाब क्रमांक :- २४.५

विषय :- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याबाबतचे प्रस्ताव.

उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाज पत्रकाचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ३१७ ते ४६७ वर सादर केलेले आहेत. सदर प्रस्तावांवर चर्चा होऊन सर्वानुमते सर्व मंजूरी प्रदान करण्यांत आली आहे.

ठराव क्रमांक : २४/१५९

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांच्या परिशिष्ट "ब" वर सादर केलेल्या सर्व प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

बाब क्रमांक :- २४.६

विषय :- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबतचे प्रस्ताव.

उपरोक्त विषयाबाबतची बाब टिप्पणी पृष्ठ क्रमांक ४६९ ते ४७७ वर सादर करण्यांत आलेली आहे. वरील विषयावर चर्चा करताना मुख्य अधिकारी यांनी सभागृहास अवगत करुन दिले की, उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी प्रदान केल्या जाणा-या "ना हरकत प्रमाणपत्राबद्दल" त्यांना मान. अध्यक्ष/प्रा. यांनी आजच सकाळी आलेल्या चर्चेत असा सल्ला दिला की, तुर्त

दुरुस्ती मंडळाने या बाबीवर विचार करू नये. मान. अध्यक्ष/प्रा. यांची अशी कल्पना आहे की, उपकरप्राप्त इमारतीत रहाणाऱ्या भाडेकरूंना १८० चौ. फू. पेक्षा जास्त थोडी अधिक जागा देणे योग्य ठरेल व या वाढीव क्षेत्रफळासाठी भाडेकरूंकडून सवलतीचा दर आकारण्यांत यावा. या संपूर्ण योजनेची कल्पना पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत राबविण्यांत आलेल्या योजनेप्रमाणे असावी अशी मान. अध्यक्ष/प्रा. यांची कल्पना आहे. वास्तव वरील विषयांतर्गत मांडण्यात आलेल्या बाबीवर विचार करण्यांत येवू नये अशी विनन्ती त्यांनी सभागृहास केली. यावर दुरुस्ती मंडळाचे मान. सभापती व सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, दुरुस्ती मंडळासमोर ठेवण्यांत आलेली उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याची प्रकरणे ही शासनाच्या प्रचलित धोरणाशी सुसंगत असल्याने त्यांना मान्यता न प्रदान करण्याची कोणतीही सबळ कारणे दिसून येत नाहीत. तसेच यावर मुंबई इमारत दुरुस्ती मंडळावरील शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपसचिव श्री. कांबळे यांनी असे मत व्यक्त केले की, जोपर्यंत राज्य शासन आपले स्विकृत धोरण बदलत नाही तोपर्यंत या धोरणाप्रमाणे सादर करण्यांत आलेल्या प्रकरणांवर विचार करणे योग्य ठरेल. तदनंतर उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याच्या परिशिष्टातील पाच प्रस्तावांवर चर्चा होऊन अनुक्रमांक २ अंतर्गत सादर करण्यांत आलेल्या मालमत्तेच्या जागी मान. सदस्य श्री. राजा चव्हाण यांनी भेट देवून त्यांचा पहाणी अहवाल सादर करावा असे ठरले व त्यांच्या पहाणी अहवालानुसार सदर मालमत्तेस "ना हरकत प्रमाणपत्र" देण्याचा पुढील निर्णय मान. सभापती/ मुं. इ. दु. व. पु. मं. यांनी घ्यावा असे सर्वानुमते ठरेले. उर्वरित चार प्रकरणांतर्गत सादर करण्यांत आलेल्या

22



प्रस्तावांना "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक :- २४/ १६०

उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याच्या खालील प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

१] भूकर पहाणी क्र. ४०२, माझगांव विभाग, डॉ. मस्कारेन्हस रोड, ई विभाग, माझगांव, मुंबई येथील "रंगवाला कंपाऊंड" म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता. [ . . .

२] भूकर पहाणी क्र. १०५८, गिरगांव विभाग, इ.क्र. ७, खेतवाडी ९वी गल्ली "डी" विभाग, गिरगांव, मुंबई [illegible]

३] भूकर पहाणी क्र. १६११ व १/१६११, गिरगांव विभाग, इ.क्र. २, पेंधर मिल लेन व ३६३ व्ही.पी. रोड, "डी" विभाग गिरगांव, मुंबई [illegible]

४] भूकर पहाणी क्र. १२९०, मांडवी विभाग, इ.क्र. ४० मेमनवाडा स्ट्रीट, "ब" विभाग, मुंबई. [illegible]

---

५] भूकर पहाणी क्र. ८४, दादर नायगांव विभाग, इ.क्र. १००ए, १००बी, १५८ व १००ई, दादासाहेब फाळके मार्ग, फ/द विभाग, दादर [पूर्व], मुंबई – १४.

सदर मालमत्तेच्या जागी मान. सदस्य श्री. राजा चव्हाण यांनी भेट देवून त्यांचा पहाणी अहवाल सादर करावा व त्यांच्या अहवालावर मान. सभापती/मुं.इ.दु. व.पु.मं. यांनी सदर मालमत्तेस "ना हरकत प्रमाणपत्र" देण्याबद्दल निर्णय घ्यावा.

---

२५

: १३ :

चर्चेच्या ओघाओघात मान. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी कामाठीपुरा ५वी गल्ली येथील पिठवाला चाळ ही इमारत मालकाबरोबर संगनमत करून १९८५ मध्ये जमिनदोस्त करण्यात आली असल्याचे निदर्शनास आणून दिले व सदर जागी पाच मजल्याची इमारत उभारण्यात आलेली असून त्यात गाळेधारक रहात आहेत. याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, ही इमारत बांधताना मंडळाची "एन.ओ.सी." देण्यात आली होती का? यावर मान. सभापती यांनी असे आश्वासन दिले की, सदर बाबतची माहिती पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

पूर्तता मु.अ. उत्तर]

तद्नंतर मान. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा समाप्त झाल्याचे जाहिर केले व पुढील बैठक मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल असे जाहिर केले.

सही/-
नि.का.अ./दुवपु/मुंबई.

सही/-
उपसभापती व मुख्य अधिकारी/दुवपु/मुंबई

सही/-
मा. सभापती/दुवपु/मुंबई

432

परिशिष्ट "अ"

मंडळाच्या दिनांक २९.९.९४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दक्षिण परिमंडळातील मंजूर करण्यात आलेल्या मूळ अंदाजपत्रकाची, सुधारीत अंदाजपत्रकाची व ना हरकत प्रमाण पत्रा अंदाजपत्रकाची माहिती.

| अ.क्र. | विभाग | इमारतीचा तपशिल | दुरुस्तीचा टप्पा / मंडळ/नाहप्र | भाडेकरूंची संख्या / रहिवाशांची संख्या निवासी अधिक अनिवासी == एकूण. | क्षेत्रफळ / दर प्रति चौ.मी. | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम. / निव्वळ टप्प्याची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | ब | ४०–४२ एम.ए.सारंग स्ट्रीट | पहिला / मंडळ. | तळ अधिक ३ / २२ + २ =२४ | ६३३.१३ / ४८३.९४ | ३०६३९३ /– / ३०६३९३ /– |
| २. | ब | ९३–९५ टनटनपुरा स्ट्रीट | तिसरा / मंडळ | तळ अधिक २ / ७ + ५ =१२ | ७५१.०० / ७२९.६७ | ५४७९८५ /– / ३९२८६५ /– |
| ३. | ब | २–१४ तांडेल स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ अधिक ४ / ४३ + १६ =५९ | २८५०.०० / २७३.७८ | ७८०२७७ /– / ५००१९७ /– |
| ४. | सी–१/२ | ३० काझी स्ट्रीट | पहिला / मंडळ | तळ अधिक ३ / ३ + १ = ४ | १८८.९२ / ५००.८९ | ९४६२९ /– / ९४६२९ /– |
| ५. | सी–१/२ | २४–२८ याकुब स्ट्रीट | चौथा / मंडळ | तळ अधिक २ / १५ + ५ =२० | ४२५.०० / ६२५.३५ | २६५७७६ /– / १०९८३८/– |

२/——

| ६. | सी –१/२ | ६२ दुसरा भाईवाडा | दुसरा / मंडळ | तळ अधिक४ / ६ + ८ | ५००.७८ / १०४४.९८ | ५२३३१० /– / ४०८५१३/– |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मंडळ | १५ + ५ =२० | ६२५.३५ | २६५७७६ /-<br>१०९८३८/- |

२/——

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | सी -१/२ | ६२ दुसरा भाईवाडा | दुसरा<br>मंडळ | तळ अधिक४<br>६ + ८ | ५००.७८<br>१०४४.९८ | ५२३३१० /-<br>४०८५१३/- |
| ७. | अ | ३५ मेरीवेदर रोड | चौथा<br>मंडळ | तळ + ३+ ४<br>प्रशत:<br>१९ + २=२१ | १७००.७६<br>७८६.५२ | १३३७६१३/-<br>९९५६९३ /- |
| ८. | सी-१/२ | ११८-१२० घोगारी मोहल्ला. | दुसरा<br>मंडळ | तळ अधिक ४<br>२१ + २ =२३ | ५८७.७२<br>७४४.०७ | ४३७३०५ /-<br>२६०९८९ /- |
| ९. | सी-१/२ | १०७-१११ मािहम-तुरा मार्ग | चौथा<br>मंडळ | तळ + ४<br>६२ +५=६७ | १३१५.७३<br>१०५४.२६ | १४७१४७१/-<br>२९९३६१ /- |
| १०. | सी-१/२ | ३८ दुसरी कारपेंटर स्ट्रीट | दुसरा<br>मंडळ | तळ अधिक ३<br>७ + ५ =१२ | ५३६.००<br>७४३.५१ | ३९८५२४ /-<br>३०६५२४ /- |
| ११. | सी-१/२ | ४५-४७ निझाम स्ट्रीट | चौथा<br>मंडळ | तळ अधिक ४<br>१७ + १ =१८ | ५०७.००<br>९८५.४० | ४९९५९८ /-<br>२५४४९८ /- |
| १२. | सी/१/२ | ८८-८८ अ,१ली पठाण स्ट्रीट | तिसरा<br>मंडळ | तळ अधिक ३<br>५ + १३ =१८ | ८४६.००<br>६३५.८२ | ७९१७०८ /-<br>३३०९६५ /- |
| १३. | सी-३/४ | १०५ बी/सी, कॅव्हेल क्रॉस लेन नं. ७ | तिसरा<br>मंडळ | तळ अधिक ३<br>५ + १३=१८ | ८३४.८६<br>७३२.२० | ६११२९०/-<br>३०७६१५/- |

— ३ —

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १४. | सी–३/४ | ३३७ काळबादेवी रोड | दुसरा / मंडळ | तळ अधिक ५ / ६ + २६ = ३२ | १४८२.६० / ८४३.७१ | १२५०८९६/– / ७०७९५४ /– |
| १५. | सी–१/२ | ६६–६६ ए शेख मेमन स्ट्रीट | पहिला / मंडळ | तळ + ४ + ५ / २ + ४ = ६ | २४६.०० / ६७६.५९ | १६६४४२/– / १६६४४२/– |
| १६. | सी–३/४ | ३०६ काळबादेवी स्ट्रीट | चौथा / मंडळ | तळ + ३ / २५+२९ = ५४ | १४३६.०० / ७४४.४८ | १०६९०७५/– / ३७१५२३ /– |
| १७. | सी–३/४ | १११एम, १ली कॅव्हल क्रॉस लेन. | दुसरा / मंडळ | तळ + २ / ५ + १ = ६ | ३३४.०० / ९३३.७१ | ३११८६२ /– / २३७३५८ /– |
| १८. | सी–३/४ | १४० के, कॅव्हल क्रॉस लेन | चौथा / मंडळ | तळ + ४ / १७ + ७ = २४ | १२९०.०० / ५५१.२९ | ७११६५ /– / ३४५५२५/– |
| १९. | सी–३/४ | ४५ वेलिंग्टन स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ + ३ / ४ + ३ = ७ | २१६.३२ / ८४८.८८ | २५१५४२/– / १८१०४४ /– |
| २०. | डी–१ | १५ बाबुलनाथ | दुसरा / मंडळ | तळ + ६ / १४ + ४ = १८ | २९०७.५० / ७५२.६१ | २१५९५८/– / ११०८२७८/– |
| २१. | डी–१ | ४१९ व्ही. पी. रोड | पहिला / मंडळ | तळ+१+२ अंशत: / ११ + ० = ११ | ६४४.७७ / ६२४.०५ | ४०२३७३ /– / ४०२३७३ /– |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१. | डी-१ | ४१९ व्ही.पी. रोड | पहिला / मंडळ | तळ+१+२ अंशत: / ११ + ० = ११ | ६४४.७७ / ६२४.०५ | ४०२३७३ /— / ४०२३७३ /— |

४/—



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २२. | डी-१ | २४७ अ, व्ही.पी. रोड | दुसरा / मंडळ | तळ+२+३ अंशत: / २१+०=२१ | ६९२.७७ / ५४४.२१ | ३७६९५६ /— / ३२०९५६ /— |
| २३. | डी-१ | १४१ताडदेव रोड | तिसरा / मंडळ | तळ + ४ / १७+४ =२१ | २०४६.०० / ७२२.०८ | १४७७३७४/— / ६६८५६२ /— |
| २४. | डी-२ | ३७२-३७८ ग्रँट रोड | तिसरा / मंडळ | तळ + ४ / ३५ +१० | ४२२४.०० / ७३९.०० | ३१२४५१२/— / १३०३८६८ /— |
| २५. | डी-२ | १८ फॉकलंड रोड नं. ४ | दुसरा / मंडळ | तळ+२+अँटीक / १२ + ०=१२ | २०८.३१ / १३०३.८० | २७१६०८/— / २२३१०८ /— |
| २६. | सी-१/२ | ३१६ अ, व्ही.पी. रोड | तिसरा / मंडळ | तळ + ५ / १० + ४=१४ | १०१४.०० / ५७१.९१ | ५७९९२०/— / ४३८४०४ /— |
| २७. | डी-१ | ५२-सी.डीखत्तर गल्ली | तिसरा / मंडळ | तळ + ३ / १२०+०=१२० | ४२१८.३२ / ३८५.७४ | १६२७१७६/— / ५८४९०५/— |
| २८. | सी-३/४ | ११-१३ ओल्ड स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ + ३ / ३+३३=३६ | ५९२.२१ / ६७४.८६ | ३९९६६३/— / २६१०७६/— |
| २९. | बी- | २१०/२१४ कांबेकर स्ट्रीट(स्) | पहिला / मंडळ | तळ + ५ / १० + ८=१९ | ९५९.२९ / ८०३.६८ | ७७०९६२/— / ७७०९६२/— |

५/—

834

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३०. | बी | ६५ मेमन वाडा | चौथा (४)<br>मंडळ | तळ + ४<br>३१+१० =४१ | १५३७.००<br>७७८.०१ | ११९५८१२ /-<br>८७०८४८ /- |
| ३१. | बी | ५१-६१ नाखोदा स्ट्रीट | दुसरा(४)<br>मंडळ | तळ + ४<br>१५+४६=६१ | २१७८.७१<br>७४२.८७ | १५८१३४९ /-<br>१३५६३४९ /- |
| ३२. | सी१/२ | ३६-३८ दुसरी पठाण स्ट्रीट | दुसरा (४)<br>मंडळ | तळ + २<br>५ + ३=८ | २२६.००<br>१४०७.०७ | ३१८००० /-<br>२७४५४० /- |
| ३३. | डी-१ | ११-१५ फ्रेंच ब्रिज | तिसरा(४)<br>मंडळ | तळ + ३<br>५६ +१६=७२ | २९२४.००<br>६१४.१७ | १७९५८४२/-<br>१३१९८०२/- |
| ३४. | डी-२ | २७५ एल. जावजी दादाजी रोड | पहिला(४)<br>मंडळ | तळ + १<br>८ + ० =८ | ७६४.००<br>३२२.१३ | २४६१०८ /-<br>२४६१०८/- |
| ३५. | डी-२ | १४३-१४७ ताडदेव रोड | दुसरा [पु.सु.]<br>मंडळ. | तळ + ४<br>४३+१२=५५ | ३९१२.००<br>४९०.०० | ११९७१५१ /-<br>१७६७१५१ /- |
| ३६. | डी-२ | ७२ नानुभाई देसाई रोड | दुसरा [सु]<br>मंडळ | तळ + ४<br>१३+५=१८ | ९८४.५७<br>१०९३.३५ | १०७६४७९/-<br>९४४२६८/- |
| ३७. | डी-२ | ३ खेतवाडी ७वी गल्ली. | चौथा[सु.]<br>मंडळ | तळ + ३<br>८ + ४ =१२ | ५६५.२१<br>१३६६.९१ | ७७३९५९/-<br>५८९९५२ /- |
| ३८. | सी१/२ | ६-८, भोगरी मोहल्ला | दुसरा [सु]<br>मंडळ | तळ + ४<br>४४ +१२=५६ | १६१३.५०<br>७४९.९४ | १२१००४२/-<br>९३२९८२ /- |

६/----

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३९. | अे | २२-२८, अपोलो स्ट्रीट | दुसरा [सु] / मंडळ | तळ + ४ / ५ + ४७ = ५२ | ४८०४.०० / ५४८.४७ | २६३५३५९ /- / २३१६२०८ /- |
| ४०. | डी-१ | ७१एनएम पाटकर मार्ग | पहिला [सु] / ना.ह.प्र. | तळ + ३ / ६ + १ = ८ | १०४८.६४ / ९२६.३५ | ९७१४१० /- / ९७१४१० /- |

दि. २९.९.९४ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या २४ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेली अंदाजपत्रके [ उत्तर परिमंडळ]

परिशि

| अ.क्र. | विभाग | वर्गवारी | इमारतीचे नांव | दुरुस्ती टप्पा / मंडळ/ ना.ह.प्र. | मजले / भाडेकरु / नि+अनि. = एकूण | क्षेत्रफळ चौ.मी. / दर चौ.मी. खर्च | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ई-१ | अ | इ.क्र. १४-२४अ, रेडीमनी बि. मिर्झा, गालिब मार्ग [क्लेअर रोड] | पहिला मंडळ | तळ +४ / २१+७=२८ | ३०८९.०५ / २२४.६० | ४६९३०८.०० / ४६९२०८.०० |
| २ | ई-२ | अ | इ.क्र. १६५-एक तुराणी चाळ मौलाना आझाद मार्ग | पहिला मंडळ | तळ +१ / २० +०=२० | ३७४=०४ / ४१०=८८ | १५३६८९=०७ / १५३६८९=०० |
| ३ | ई-२ | अ | इ.क्र. ४७१-४८९, एन.एम.जोशी मार्ग. | पहिला मंडळ | तळ + १ / ४१+१६=५७ | ११४८.६५ / ४३२.२० | ४९६४४८.०० / ४९६४४८.०० |
| ४ | ई-२ | अ | इ.क्र. ५ हाजी कासम बिल्डींग वर्सोवा, स्ट्रीट | पहिला मंडळ | तळ + ३ / ८+०=८ | ६४५.७९ / ४४२.१९ | २८५५६७.०० / २८५५६७.०० |
| ५ | ई-२ | अ | इ.क्र. २६८-२६२-अ, देवनी स्ट्रीट बिल्डींग, बाप्टी स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ+२ / १४+८=२२ | ७०२.५० / ४६८.५२ | ३२९१३७.०० / १२४९१३.०० |
| ६ | ई-२ | अ | इ.क्र. ६७८-६७८ सी, जरीवाला बिल्डींग, एन.एम.जोशी मार्ग. | दुसरा मंडळ | तळ +२ / २४+५=२९ | ७७१.४६ / ५०५.०० | ३८९५९३.०० / ३०४५९३.०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [७] | ई–२ | अ | इ. क्र. १६७–टी, ईशा बिल्डींग, एम. र. रोड | पहिला / मंडळ | तळ+ २ / १०+ ५=१५ | ६९२=५१ / ५१०=७५ | ३४३६७३=०० / ३४३६७३=०० |
| [८] | ई–२ | अ | इ. क्र. ३३–४२, हिरजी चाळ, मौलाना आझाद रोड | दुसरा / मंडळ | तळ+१+२ [अशत:] / ४४+२७=७१ | २१०७. २२ / ५२७. ४८ | ११११५३६. ०० / ५७६९३८. ०० |
| [९] | ई–२ | अ | इ. क्र. १४–फ, स्टेबल स्ट्रीट | तिसरा / मंडळ | तळ+ २ / ६८+०=६८ | १३५७. २६ / ५३८. ०२ | ७१६६६९. ०० / ३१९२८१. ०० |
| [१०] | –"– | अ | इ. क्र. २०, किस्मत मंझील, बदरू रंगारी स्ट्रीट | दुसरा / मंडळ | त + २ / ३३+१६=४९ | ९०५=३५ / ६१२=३१ | ५९१२८४=०० / ३९८१५४=०० |
| [११] | –"– | अ | इ. क्र. ९, हनुमान बिल्डींग, कामाठीपुरा ४थी गल्ली | पहिला / मंडळ | तळ+२+३ [अशत:] / ९+ १=१० | १४५. २३ / ६५८. ८६ | ९३७११. ०० / ९३७११. ०० |
| [१२] | ई–२ | अ | इ. क्र. ६१६ फ–ग, लक्ष्मी बिल्डींग, ना. म. जोशी मार्ग | दुसरा / मंडळ | तळ+ ३[ [चौथा अशत:] / २६+ ०=२६ | ८४५=५१ / ७२५=४१ | ६१४१९२=०० / ३७६९६०=०० |
| [१३] | ई–२ | अ | इ. क्र. १६७–सी, नुरानी चाळ क्र. ३, मौलाना आझाद रोड | पहिला / ना. ह. प्र. | तळ+ १ / १९+०=१९ | ४०२. ०० / ७३३. ५८ | २९४९०३=०० / २९४९०३=०० |
| [१४] | ई–२ | अ | इ. क्र. ९अे–९बी, पत्रावाला चाळ, सांखळी स्ट्रीट, ४थी गल्ली | ति. टप्पा / मंडळ | तळ+ २ [अशत:] / ५३+३=५६ | ८५५. ९२ / ७४४. ०४ | ६३६०२५. ०० / १७८१२२. ०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [१५] | ई-२ | अ | इ. क्र. २७, परमानंद रामजी बिल्डींग, कामाठीपुरा, ८वी गल्ली | प. टप्पा / मंडळ | तळ+ ३ / ४+ ०=४ | १०२.०० / ७४६.४८ | ७६१४१.०० / ७६१४१.०० |
| [१६] | -"- | अ | इ. क्र. ३८, पापडवाला बिल्डींग, टेमकर स्ट्रीट, नागपाडा | पहिला / मंडळ | तळ+ ३ / ५+ १=६ | २०५.८८ / ७४७.१० | १५४५६२.०० / १५४५६२.०० |
| [१७] | -"- | अ | इ. क्र. ४०, कामाठीपुरा, ७वी गल्ली | पहिला / मंडळ | तळ+ २ / ५+०=५ | ६६.०० / १२९५.४३ | ८५४९९.०० / ८५४९९.०० |
| [१८] | फ. ग. [द] | अ | इ. क्र. १८, रावसन बिल्डींग, परमार गुरुजी मार्ग | दुसरा / मंडळ | तळ+ ३ / १०+०=१० | ९००.१० / ३७६.०० | ३३८४४२.०० / १६७०६३.०० |
| [१९] | -"- | अ | भगवानदास भोगले चाळ, "डी" ब्लॉक, जी. डी. आंबेकर मार्ग | दुसरा / मंडळ | तळ+ १ / ४०+ ०=४० | ६६८.३८ / ४६९.१८ | ३१३५९६.०० / २६९६००.०० |
| [२०] | -"- | अ | इ. क्र. १७५, कानजी देवजी ट्रस्ट चाळ, ना. म. जोशी मार्ग | दुसरा / मंडळ | तळ+१ / १२+३=१५ | ४१५.०० / ५४०.१६ | २२४१६९.०० / १४८८०७.०० |
| [२१] | -"- | फ | इ. क्र. ७४, बीबी, न्यु कॅप्टन बिल्डींग, आचार्य दोंदे मार्ग, शिवडी | पहिला / मंडळ | तळ+२+३ [अंशत:] / ६+०=६ | ३००.१३ / ५९८.३९ | १७९५९५.०० / १७९५९५.०० |
| [२२] | -"- | अ | इ. क्र. २०७-बी, महेश भुवन, गणेश गल्ली, लालबाग | तिसरा / मंडळ | तळ+ २ / १४+१=१५ | ३९९.८५ / ६२१.९७ | २४८६९५.०० / १७६३९३.०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [२३] | फ.ग. [द] | अ | इ. क्र. ४८, दयाविरा बिल्डींग एलफिन्स्टन रोड | दुसरा / मंडळ | तळ + २ / १३+४=१७ | ४२९.०० / ६३५.१९ | २७२५००.०० / २२७००७.०० |
| [२४] | –"– | अ | इ. क्र. ३७–एफ, मविना मॅन्शन, गोविंदजी केणी रोड | तिसरा / मंडळ | तळ+३ / ३४+१०=४४ | १०१०.०० / ६४२.३३ | ६४८७५६.०० / ४९०३५८.०० |
| [२५] | –"– | अ | इ. क्र. १५१–१५३–ओ, रंगारी चाळ, दादासाहेब फाळके रोड, दादर | पहिला / मंडळ | तळ + २ / ६+४=१० | ५५८.४९ / ६७०.८७ | ३७४६७५.०० / ३७४६७५.०० |
| [२६] | –"– | अ | इ. क्र. १२० डी, कृष्णा नगर, डॉ. बा. आंबेडकर मार्ग | तिसरा / मंडळ | तळ + ३ / २४+४=२८ | १६४१.६८ / ६७५.८० | ११०९४४७.०० / ५७६१३९.०० |
| [२७] | –"– | ब | इ. क्र. १११–ओ, मोहम्मद रावजी चाळ, दादासाहेब फाळके रोड, दादर [पु] | तिसरा / मंडळ | तळ + २ / २८+४=३२ | ९३७.३७ / ६८२.४७ | ६३९७२८.०० / १७४९५८.०० |
| [२८] | –"– | अ | इ. क्र. ३८१–अ, सफियाबाई चाळ, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल | तिसरा / मंडळ | तळ + १ / १४+४=१८ | ४८०.६५ / ६८३.५५ | ३२८५४७.०० / १४७४७०.०० |
| [२९] | –"– | अ | इ. क्र. ५४, सुरज बिल्डींग, ज. आ. मार्ग, एलफिन्स्टन रोड | चौथा / मंडळ | तळ + ३ / ४४+१६=६० | २८५७.५० / ६८५.६४ | १९५९२०५.०० / १३४९८७८.०० |
| [३०] | –"– | अ | इ. क्र. ४७७, लक्ष्मी नारायण हाउस, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी | पहिला / मंडळ | तळ + १ [अंशतः] / १९+२=२१ | ४१६.९१ / ६९९.७२ | २९१७२१.०० / २९१७२१.०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [३१] | फ. ग. [द] | अ | इ. क्र. १५१-बी-सी, रंगारी चाळ, दादासाहेब फाळके रोड | दुसरा मजला | तळ+ १ / ३१+ ०=३१ | ७८५.०० / ७०८.१३ | ५५५८८६.०० / ४९२८८६.०० |
| [३२] | -"- | अ | इ. क्र. ३८३-बी, हरिदास मथुरादास चाळ, गणेश गल्ली, लालबाग | तिसरा मजला | तळ+ २ / २५+०=२५ | ५४२.७३ / ७३८.०५ | ४००५६३.०० / २४१२३५.०० |
| [३३] | -"- | अ | इ. क्र. ३-अे, मोती चाळ ६, दादासाहेब गायकवाड मार्ग | चौथा मजला | तळ+ १ / ३६+२=३८ | ६७६.१४ / ७४२.१२ | ५००९८२.०० / १५७०३९.०० |
| [३४] | -"- | अ | ... चा क्र. ३, ... रोड | चौथा मजला | तळ+ ३ / ६०+१५=७५ | १६६७.२१ / ७४५.०६ | १२५२१७५.०० / ७१४३२२.०० |
| [३५] | फ. ग. [उ] | अ | इ. क्र. १५९-अे, पिठुळा मा बिल्डिंग वीर सावरकर मार्ग, माहिम | पहिला मजला | तळ+ ३ / १२+०=१२ | ७५०.१८ / २०५.४२ | १५३३५२.०० / १५३३५२.०० |
| [३६] | -"- | अ | इ. क्र. ३२२-सी, शांती निकेतन, डॉ. बा. आंबेडकर मार्ग, माटुंगा | पहिला मजला | तळ+ २ / २४+०=२४ | ७२७.७९ / २१०.०० | १५२८२९.०० / १५२८२९.०० |
| [३७] | -"- | अ | इ. क्र. ३२२-बी, शांती निकेतन, डॉ. बा. आंबेडकर मार्ग, माटुंगा | पहिला मजला | तळ+ २ / २०+०=२० | ८७३.२७ / २७३.८० | २३९१०६.०० / २३२१०६.०० |
| [३८] | -"- | अ | इ. क्र. १०, शहा मॅन्शन, वाचनालय मार्ग, दादर | पहिला मजला | तळ+ ३ / १२+०=१२ | ६०६.७५ / ३७२.७७ | २२६१८०.०० / २२६१८०.०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| [३९] | फ. ग. [उ] | अ | इ. क्र. ११०, नजनाभाई मंझिल, लेडी जमशेटजी रोड, माहिम | दु. टप्पा / मंडळ | तळ+ २ / १०+ ०=१० | २४९. ६२ / ५६१. ६५ | १४०२००. ०० / १०८९४०. ०० |
| [४०] | -"- | अ | भारती बिल्डींग, शितलादेवी मंदीर मार्ग, माहिम | पहिला / मंडळ | तळ + १ / १३+०=१३ | २८४. ५५ / ७०२. ७५ | १९९९७०. ०० / १९९९७०. ०० |
| [४१] | फ. ग. [द] | अ | इ. क्र. ४६, वीरा बिल्डींग, एलफिन्स्टन रोड | चौथा / मंडळ | तळ+२+३ [अंशत:] / २४+६=३० | ६७०. ०० / ७१६. १४ | ४७९८१९. ०० / १३१५२६. ०० |
| [४२] | फ. ग. [उ] | अ | इ. क्र. ५७५-अे, तुतुम कुंज, बी. एन्. रोड, माटुंगा | दु. टप्पा / मंडळ | तळ+ २ / ९+०=९ | ५६९. ५९ / ७८३. १८ | ४४६०९७. ०० / २०१८२१. ०० |
| [४३] | -"- | अ | इ. क्र. १५, जया भवन, पितांबर लेन, माहिम | दुसरा / मंडळ | तळ+ २ / ३१+०=३१ | २०७=११ / ८७५. ९२ | ७९४५६१. ०० / ६४०५१५. ०० |
| [४४] | फ. ग. [द] | अ | इ. क्र. २३९ "अे", हेंद्रे बिल्डींग, फर्ग्युसन रोड | चौथा / मंडळ | तळ+ ३ / ५६+१०=६६ | १८०३. ०० / १५३. ५५ | १७१९२४५. ०० / ५०९२८०. ०० |
| | | | | | | एकूण [अ] | २१३५२९८२. ४० / १२९८३०२३. ०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सुधारित अंदाजपत्रके | | | | | | | |
| ४५ | क. ग. [द] | अ | इ. क्र. १४०, बारा चाळ, ८, ९, १० सनमिल लेन, लोअर परेल | चौ. टप्पा / उर्वरित सुधार मंडळ | तळ +-२ / ७४+-१६=९० | २६७२.५८ / ७१६.९६ | ११८९०३५.०० / ८५०७९८.०० |
| ४६ | ई-२ | अ | इ. क्र. ५४७-५४९-अ, बी लक्ष्मी ना. म. जोशी मार्ग. | दुसरा टप्पा / सुधारित मंडळ | तळ +- २ / ५५+-४=५९ | १३५०.८० / ६२६= ११ | ८४५७६२.०० / ६६४१४४.०० |
| ४७ | ई-१ | अ | इ. क्र. ४२, नुरजँहा मॅन्शन डिमटिमकर रोड | तिसरा टप्पा / सुधारित मंडळ | तळ +- २ / ४४+-५=५९ | १६४६.०० / ७३७.४८ | १२१३८९२.०० / ७९३२१४.०० |